| | | |
|---|---|---|
| MKCL Creating a Knowledge Lit World www.mkcl.org | **Subject – इतिहास/राज्यशास्त्र** | **Marks: 40** |

| | | |
|---|---|---|
| **प्र.१** | **अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** | ४ |
| १) | लिओनार्दो-द-विंची फ्रान्सचा सोळाव्या शतकात होऊन गेलेला राजा____________यांच्या पदरी होता.<br>अ) पहिला फ्रान्सिस ब) पहिला जॉर्ज क) चौदावा लुई ड) दुसरा जॉर्ज | |
| २) | 'लोककला' ही एक_________काळापासून अखंडितपणे चालत आलेली परंपरा आहे.<br>अ) प्राचीन ब) मधयुगीन क) अश्मयुगीन ड) पुरानाश्मयुगीन | |
| ३) | भाऊ महाजन यांनी________हे वृत्तपत्र सुरु केले.<br>अ) दर्पण ब) मराठा क) प्रभाकर ड) केसरी | |
| ४) | पुण्यातील बालेवाडी येथील_________क्रीडा संकुल कुस्ती व इतर खेळाच्यां प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध आहे.<br>अ) शहाजीराजे ब) दुसरा बाजीराव पेशवा क) श्रीशिवछत्रपती ड) सवाई माधराव | |
| **प्र.१** | **आ) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करुन पुन्हा लिहा.** | ४ |

१)

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय | अ) | मुंबई |
| २) | असिरियन ग्रंथायल | ब) | इजिप्त |
| ३) | सरस्वती महाल ग्रंथालय | क) | तमिळनाडू |
| ४) | नॅशनल लायब्ररी | ड) | पुणे |

२)



| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | विष्णुभट गोडसे | अ) | माझा प्रवास |
| २) | गोपाळ निळकंठ दांडेकर | ब) | दूर्गभ्रमण यात्रा आयोजित |
| ३) | थॉमस कुक | क) | तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय |
| ४) | बेजामिन ट्युडेला | ड) | जगाचा नकाशा व पृथ्वी गोलाचे आरेखन |

३)

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | कीचकवध | अ) | निळकंठ खाडिलकर |
| २) | घाशिराम कोतवाल | ब) | विजय तेंडुलकर |
| ३) | उद्याचा संसार | क) | विश्राम बेडेकर |
| ४) | नटसम्राट | ड) | वि.वा. शिरवाडकर |

४)


| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | गांधार | अ) | शिल्पकला शैली |
| २) | बोरोबुदुर | ब) | राष्ट्रीय वारसास्थळ |
| ३) | अशोकस्तंभ | क) | भारताचे राष्ट्रीय मानचिन्ह |
| ४) | गोलघुमट | ड) | विजापूर |

| | | |
|---|---|---|
| **प्र.२ १)** | **अ) दिलेली संकल्पना चित्र पूर्ण करा. (कोणतेही दोन)**  | ४ |
| २) |  | |
| ३) | पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा: | |


| मंदिर शैली | नागर | द्राविड |
|---|---|---|
| वैशिष्ट्ये | | |
| उदाहरणे | | |

| | | |
|---|---|---|
| **प्र.२** | **आ) पुढील संकल्पा स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** | ४ |
| १) | छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय , मुंबई | |
| २) | लोककलेच्या परंपरा | |
| ३) | संज्ञाकोश | |
| **प्र.३** | **अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** | ६ |
| १) | इतिहसाच्या अभ्यास पद्धती विज्ञानाच्या पद्धतीपेक्षा वेगळया असल्या तरी त्या कमी प्रतिच्या नाहीत, अशी अनेक तत्वाज्ञांची खात्री पटली. | |
| २) | राष्ट्रवादी इतिहासलेखनात स्वातंत्रवीर सावरकरांचे योगदान कोणते? | |
| ३) | ऐतिहासिक स्थळाचे जतन आपण कसे करु शकतो? | |
| ४) | विसाव्या व एकविसाव्या शतकात खेळांचे आंतरराष्ट्रीयकरण झाले असे का म्हणतात? | |
| ५) | एकोणिसाव्या शतकातील इतिहास लेखनाच्या पद्धतीवर प्रामुख्याने बर्लिन विद्यापीठातील ‘लिओपॉल्ड व्हॉन रांके’ यांच्या विचारांचा पगडा होता. | |
| **प्र.३** | **आ) पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | ६ |
| १) | सूचि वाङमयाविषयी माहिती लिहा. | |
| २) | मार्क्सवादी इतिहास लेखनाचे महत्त्वाचे सूत्र कोणते? | |
| ३) | सांस्कृतिक वारसा स्थळांच्या यादीतील महाराष्ट्रातील ठिकाणे कोणती हे शोधून लिहा. | |
| **प्र.४** | **दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.** | ४ |
| | ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली असे सद्यपरिस्थितीत म्हणता येईल. सुमेर साम्राज्यात होऊन गेलेले राजे, त्यांच्यामधील संघर्षाच्या कहाण्या यांची | |


| | | |
|---|---|---|
| | वर्णने तत्कालीन शिलालेखांमध्ये जतन केलेली आहेत. त्यातील सर्वाधिक प्राचीन शिलालेख सुमारे ४५०० वर्षांपूर्वी सुमेरमधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा असून तो सध्या फ्रान्समधील लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवलेला आहे.<br>१) ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याची परंपरा कोणत्या संस्कृतीत झाली?<br>२) सुमेर संस्कृतीतील प्राचीन शिलालेखांचा संग्रह कोठे आहे?<br>३) सुमेर संस्कृतीत होऊन गेलेले राजे त्यांच्यामधील संघर्षाच्या कहाण्या कोठे जतन केलेली आहेत. | <br><br><br>१<br>१<br>२ |
| **प्र.५** | **अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | ८ |
| १) | कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा. | |
| २) | मुद्रण तंत्रज्ञानाची ओळख पटण्याआधी संवादाच्या कोणत्या पद्धती वापरल्या जात होत्या? | |
| ३) | तमाशा म्हणजे काय स्पष्ट करा. | |
| | **राज्यशास्त्र (20 marks)** | |
| **प्र.६** | **दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** | ४ |
| १) | भारतात आता_________वर्षे पूर्ण झालेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे.<br>अ) १५ ब) १८ क) २१ ड) २५ | |
| २) | भारतात________पद्धती अस्तित्वात आहे.<br>अ) एकपक्ष ब) द्विपक्ष क) बहुपक्ष ड) पक्षविहीन | |
| ३) | पक्षला लोकांचा जो पाठिंबा मिळतो, त्याला त्या 'पक्षाच__________' असेही म्हटले जाते.<br>अ) लोकानुनय ब) लोकसत्ता क) लोकशाही ड) जनाधार | |
| ४) | हरितक्रांती________या उद्देशाने करण्यात आली.<br>अ) पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे ब) जंगलांचे संरक्षण व वृद्धी करणे.<br>क) शेतीचे उत्पादन वाढवून देश स्वावलंबी बनवणे ड) वृक्षतोड थांबवणे | |
| **प्र.७** | **पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** | ४ |
| १) | सर्वसमावेशक लोकशाहीमुळे समाजातील संघर्ष कमी होतात. | |
| २) | काही वेळा निवडणूक आयोगाला मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतात. | |
| ३) | डॉ. राजेंद्रसिंह राणा यांना 'भारताचे जलपुरुष' या नवाने ओळखले जाते. | |
| **प्र.८** | **अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** | ४ |
| १) | माहितीचा अधिकार | |
| २) | पक्षपद्धती | |
| ३) | राजकारणाचे गुन्हेगारीकरण | |
| **प्र.८** | **आ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतेही दोन)** | |
| १) | पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा. | |




२) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.




३) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.




| | | |
|---|---|---|
| **प्र.९** | **पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | ४ |
| १) | 'लोकशाही बळकट करण्यात भारतीय न्यायालयांची भूमिका महत्त्वाची ठरली', हे विधान स्पष्ट करा. | |
| २) | ईव्हीएम मशीनच्या वापराचे कोणते फायदे झाले? | |
| ३) | आसाम गण परिषदेची उद्दिष्टे लिहा. | |
| ४) | जागतिक पातळीवर लोकशाहीसमोर कोणती आव्हाने आहेत? | |

*This question paper is for practice purpose only.